अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन एम.बी.ए (व्यवस्थापनशास्त्र) महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

**शासन निर्णय** :- क्र.टिईएम-२००८/( २३७/०८)/तांशि-१,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : - ३० जून, २००८ .

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे दिनांक ३० मे, २००८ व १० जून, २००८ चे क्र. १) ०८/०१/MHA/MBA/२००८/००५

२) ०८/०१/MHA/MBA/२००८/५६

३) ०८/०१/MHA/MBA/२००८/१२०

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००८-२००९ करिता खाली नमूद संस्थांना नविन एम.बी.ए. ( व्यवस्थापनशास्त्र ) महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे एच. के. इंस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, म्हाडा कॉम्प्लेक्स, प्रतिक्षानगर, ओशिवरा, जोगेश्वरी( पश्चिम ) मुंबई -४०० १०२ | एम.बी.ए | ६० |
| २ | कमला एज्युकेशन सोसायटीचे प्रतिभा इंस्टिटयूट ऑफ बिजनेस मॅनेजमेंट.( PIBM) ब्लॉक नं. डी-III, प्लॉंट नं. ३, एमआयडीसी. चिंचवड, पुणे-४११०१९ | एम.बी.ए. | ६० |
| ३ | डॉ. डी. वाय . पाटील एज्युकशेन ॲकेडमीचे डॉ. डी. वाय. पाटील इंस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट सं. नं. १२४, मु.पो. अंबी, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे-४१०५०६ | एम.बी.ए. | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थांना खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००८-२००९ नविन एम.बी.ए. ( व्यवस्थापनशास्त्र ) महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.